१९५५ पासून निर्भिड लिखाण करणारे व महिलेने चालविलेले स्वतंत्र दैनिक

# लोकशाही

लोक LIVE
तुमच्या मनातलं...!
www.lokshahilive.com

इंटरनेट आवृत्ती - www.lokshahilive.com, https://www.facebook.com/lokshahilive/

Download Our Apps



पान 5 / राष्ट्रवादीची तिसरी विकेट!...

जळगाव, रविवार, दि.२२ मार्च २०२६ | RNI NO.MAHMAR/2009/33028, REG.NO.JAL/16/2024-26 | • अंक -१२४ • पाने ६ • किंमत ३ रु.

## सोने-चांदी

- सोने (प्रति १० ग्रॅम) : १,४५,२००
- चांदी (प्रति १ किलो): २,२७,५००

## तापमान

- कमाल : ३५ अंश सेल्सिअस
- किमान : १८ अंश सेल्सिअस

## अग्निहोत्र समय

| दि.२१ | दि.२२ |
|---|---|
| सूर्योदय : ६.३४ वा. | सूर्योदय : ६.३३ वा. |
| सूर्यास्त : ६.३६ वा. | सूर्यास्त : ६.३६ वा. |

## महत्वाचे

### पाचोऱ्यातील जगन्नाथ मंदिर येथे आज महोत्सव

**पाचोरा :** पाचोरा - वरखेडी रोडवरील आंतरराष्ट्रीय कृष्णभावनामृत संघ (इस्कॉन) संचलित जगन्नाथ मंदिर येथे आज २२ मार्च रोजी परमपूज्य लोकनाथ स्वामी महाराज यांच्या सान्निध्यात ३ रा वर्धापन दिनानिमित्त महोत्सव साजरा होणार आहे. सायंकाळी ६ वाजेपासून किर्तन, कथा, पुष्प अभिषेक, महाआरती, महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवाचा जास्तीत जास्त भाविकांनी लाभ घ्यावा असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

### परिवहन मंत्र्यांचा अचानक राजीनामा

**अमृतसर -** चंदीगडच्या राजकारणात खळबळ उडवणारी बातमी समोर आली आहे. एका अधिकाऱ्याच्या आत्महत्येवरून निर्माण झालेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर, पंजाबचे परिवहन मंत्री लालजीत सिंग भुल्लर यांनी शनिवारी मुख्यमंत्री भगवंत मान यांच्या नेतृत्वाखालील आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. एका अधिकाऱ्याने भुल्लर यांच्यावर छळाचा आरोप केला होता, याप्रकरणी चौकशी सुरु असून भुल्लर यांच्या राजीनाम्याची सातत्याने मागणी होत होती. मिळालेल्या वृत्तानुसार, अमृतसर येथे कार्यरत असलेले पीडब्ल्यूसीचे जिल्हा व्यवस्थापक गगनदीप रंधावा यांनी आत्महत्या केली. या घटनेनंतर समोर आलेल्या एका व्हिडिओमध्ये, त्यांनी भुल्लर यांच्या भीतीने हे पाऊल उचलल्याचा दावा केल्याचे आणि आपण वाचणार नाही असे म्हटले. हा व्हिडिओ सोशल मीडियावर वेगाने व्हायरल झाला, ज्यामुळे विरोधी पक्षांनी तात्काळ कारवाईची मागणी केली. काँग्रेसने भुल्लर यांच्यावर मानसिक आणि शारीरिक छळाचा आरोप करत त्यांच्यावर फौजदारी कारवाईची मागणी केली आणि त्यांच्या अटकेची मागणी केली होती.

### ज्येष्ठ नेते विष्णु मोदी यांचे निधन

**जयपूर -** राजस्थानच्या राजकारणातील ज्येष्ठ नेते आणि अजमेरचे माजी खासदार विष्णु मोदी यांचे जयपूरमध्ये खाजगी रुग्णालयात निधान झाले आहे. ते १९८४ मध्ये अजमेरचे खासदार होते. मागच्या काही दिवसांपासून त्यांची प्रकृती खालावली होती. त्यांच्या निधनाचे वृत्त समजताच राज्याच्या राजकारणात शोककळा पसरली असून मुख्यमंत्र्यांनी दुःख व्यक्त केले आहे. विष्णु मोदी यांचा जन्म एका राजकीय परिवारात झाला होता. त्यांनी स्वतःच्या हिंमतीवर आणि विकासकामांनी जनतेच्या मनात स्थान मिळवले होते.

# चाकणकरांवर राजीनाम्यानंतरही टीकेची झोड!

## राजीनामा देतांनाही मॉडेलिंग पोझ - अंजली दमानिया : त्या दर पंधरा दिवसांनी नाशिकला - रुपाली ठोंबरे

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**मुंबई** प्रतिनिधी

नाशिकमधील विकृत भोंदूबाबा अशोक खरात याच्या प्रकरणावरुन राज्यातील राजकीय वातावरण ढवळून निघालं आहे, त्याचबरोबर राज्य महिला आयोगाच्या माजी अध्यक्ष रुपाली चाकणकर यांच्यासह अनेक नेत्यांचे अशोक खरात सोबतचे फोटो समोर आले, याप्रकरणावरून रूपाली चाकणकरांवर मोठ्या प्रमाणावर आरोप प्रत्यारोप झाले, यानंतर काल (शुक्रवारी, ता२०) चाकणकरांनी आपल्या राज्य महिला आयोगाच्या पदाचा राजीनामा दिला, त्यानंतर आज या प्रकरणाची सखोल चौकशी व्हावी आणि त्यांनी त्या पदावरती असताना काही प्रकरण दाबली आहेत का? याबाबतची देखील चौकशी व्हावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी केला आहे. याबाबत बोलताना सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी म्हटलं की, काल रुपाली चाकणकारांनी राजीनामा दिला. महिला आयोग महिलांच्या



न्यायासाठी असतात. पण यांचं अध्यक्ष पद खरात सारख्या माणसाला आधार देण्यात गेलं. माझ्याकडे महिलांच्या ५/६ केसेस आल्या आहेत. काल मी सुनील तटकरे यांची बॉडी लैंग्वेज पाहिली ते संतापून पळून गेले. पण तुम्ही किती ही पळणार, मी सोडणार नाही. हे सर्व ओशो जल घ्यायचे. मुख्यमंत्र्यांना आभार तुम्ही महिलांच्या डोक्यावर हात ठेवले, तुम्ही उपकार केले राजीनामा घेऊन असंही अंजली दमानियांनी म्हटलं आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवारांबद्दलही बोलल्या. स्त्री म्हणून गेले ३ दिवस हा सगळा प्रकार घडताना त्या बघत होत्या, पण कोणतंही पाऊल उचललं नाही. महाराष्ट्रातील पहिली महिला उपमुख्यमंत्री झाल्यावर त्यांनी महाराष्ट्रातील महिलांसाठी अनेक गोष्टी करणं अपेक्षित होतं, पण ३ दिवसांनी जेव्हा कळस गाठला, सगळ्यांनीच पत्रकार परिषदा घेतल्या, त्यानंतर त्यांनी तो राजीनामा स्वीकारला. पण तो राजीनामा स्वीकारतानासुद्धा जे दिसलं ते म्हणजे सुनेत्रा पवारांचा चेहरा गंभीर

पान २ वर »

# आयोगाच्या पदासाठी नावांची चर्चा

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**मुंबई** प्रतिनिधी

नाशिकच्या भोंदूबाबा अशोक खरात प्रकरण रुपाली चाकणकर यांना चांगलंच महागात पडलं. या प्रकरणी चाकणकर यांनी शुक्रवारी रात्री उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याकडे पदाचा राजीनामा सुपूर्द केला. आता आयोगाच्या रिक्त पदावर कुणाची वर्णी लागणार, याकडे साऱ्यांचे लक्ष लागलं असताना बीडमधील एक नाव चर्चेत आलं आहे. या पदासाठी बीडमधील दिवंगत



नेत्याच्या पत्नीचे नाव चर्चेत आलं आहे. त्यांच्या समर्थनार्थ एक पोस्ट सोशल मीडियावर व्हायरल झाली आहे. दरम्यान रुपाली चाकणकर या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या पक्षाच्या नेत्या आहेत. त्या आता राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदावरून पायउतार झाल्या आहेत. त्यामुळे आता या पदावर नव्याने कोणाची वर्णी लागणार, याची चर्चा रंगली आहे. विशेष म्हणजे महिला आयोगाचे अध्यक्षपद पुन्हा राष्ट्रवादीकडेच राहणार का? असेही विचारले जात होते. परंतु मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार चाणकरांच्या राजीनाम्यानंतर आता महिला आयोगाच्या प्रमुखपदाची खुर्ची राष्ट्रवादीकडेच राहणार आहे. त्यासाठी दोन महिला नेत्यांची नावे चर्चेत आली आहेत. राष्ट्रवादी पक्ष या दोन्ही नावांवर विचार करत असल्याचे बोलले


पान २ वर »

# प्रलंबित शिक्षक भरतीचा मार्ग अखेर मोकळा

## 'पवित्र' पोर्टलद्वारेच होणार नियुक्त्या : खासगी संस्थांना 'रोस्टर'चे बंधन

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**मुंबई** प्रतिनिधी

राज्यातील जिल्हा परिषदा आणि खासगी शिक्षण संस्थांमधील प्रदीर्घ काळापासून प्रलंबित असलेली शिक्षक भरती आता मार्गी लागणार आहे. ही संपूर्ण भरती प्रक्रिया 'पवित्र' पोर्टलच्या माध्यमातूनच राबवली जाणार असून, पात्र उमेदवारांना यामुळे मोठा दिलासा मिळणार आहे. विशेष म्हणजे, भरती प्रक्रियेत



पारदर्शकता आणण्यासाठी खासगी संस्थांना आता रिक्त पदांची माहिती भरण्यापूर्वी मागासवर्गीय कक्ष आणि विभागीय आयुक्तांकडून 'रोस्टर' (बिंदूनामावली) प्रमाणित करून घेणे बंधनकारक करण्यात आले आहे. शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव रणजितसिंह देओल आणि 'कास्ट्राईब' शिक्षक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांमध्ये मंत्रालयात झालेल्या बैठकीत हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. या बैठकीत शिक्षकांच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. शिक्षक भरतीमध्ये होणारे गैरप्रकार रोखण्यासाठी कठोर नियमावली आखून देण्यात आली आहे. खासगी शिक्षण संस्थांना त्यांच्याकडील रिक्त पदांची माहिती पोर्टलवर भरण्यापूर्वी रोस्टर प्रमाणीकरण करून

पान २ वर »

### समूह शाळांची संकल्पना

जिल्हा परिषदेच्या केंद्र शाळांचे रूपांतर आता 'समूह शाळां'मध्ये करण्याचा विचार शासन करत आहे. ज्या शाळांची पटसंख्या समाधानकारक आहे, तिथे दहावीपर्यंतचे वर्ग जोडण्याबाबत सरकार सकारात्मक आहे.

# शेतकऱ्यांना दिवसा वीज, ग्रामस्थांना २४ तास पुरवठा!

## रस्ते, काँक्रिटीकरण व इतर कामांचेही लोकार्पण व भूमिपूजन

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**जळगाव** प्रतिनिधी

दोन वर्षांपूर्वी नंदगाव-फेसर्डी परिसरातील शेतकऱ्यांना दिलेला शब्द आज पूर्ण केला आहे. शेतकऱ्यांच्या अडचणी सोडवणे हेच माझे कर्तव्य आहे. '' त्यांनी मागील काळातील आपल्या आंदोलनाच्या दिवसांची आठवण करून देत सांगितले की, "पूर्वी शेतकऱ्यांच्या ट्रान्सफॉर्मर व वीज उपकेंद्राच्या प्रश्नांसाठी आम्ही आंदोलन केले. आज त्या प्रश्नांवर



कायमस्वरूपी तोडगा काढत आहोत. '' शेतकऱ्यांसाठी पाणी, वीज आणि रस्ता या तीन मूलभूत गरजा अत्यंत महत्त्वाच्या असून त्यासाठी शासन सातत्याने काम करत आहे. मतदारसंघात तसेच जिल्ह्यात वीज समस्या दूर करण्यासाठी ट्रान्सफॉर्मर, उपकेंद्रे व इतर सुविधा मोठ्या प्रमाणावर मंजूर करण्यात आल्या आहेत. जळगाव - धरणगाव तालुक्यात सुमारे ₹३२ कोटींच्या निधीतून उपकेंद्र, रोहित्रे व लाईन सुधारणा सुरू आहे. नंदगाव उपकेंद्रामुळे शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा मिळणार असून ग्रामस्थांना २४ तास वीज उपलब्ध होणार आहे. भविष्यात गरज भासल्यास येथे ५ एमव्हीए क्षमतेचा अतिरिक्त ट्रान्सफॉर्मर बसविण्यात येणार अशी ग्वाही देत याशिवाय परिसरातील सुमारे ₹१५० कोटींच्या भोकर पुलाचे काम प्रगतीपथावर असल्याची माहिती देत,

पान २ वर »

# हिवरा नदीपात्रात बुडुन तरुणाचा मृत्यू

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**पाचोरा** प्रतिनिधी

पाचोरा शहरातील हिवरा नदीपात्रात बुडुन एका २४ वर्षीय तरुणाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना २१ मार्च रोजी सकाळच्या सुमारास उघडकीस आली आहे. घटनेप्रकरणी पाचोरा पोलिस स्टेशनमध्ये अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. पाचोरा शहरातुन वाहणाऱ्या हिवरा नदीपात्रात एका तरुणाचा मृतदेह तरंगत्या अवस्थेत



आढळून आला. घटनेची माहिती मिळताच पाचोरा पोलिस स्टेशनचे कर्मचारी हे जय मल्हार रुग्णवाहिका चालक अमोल पाटील यांचेसह घटनास्थळी दाखल होवुन

पान २ वर »

